मायदेशात मेक्सिकोचाच दबदबा

दक्षिण कोरियावर मात; यंदाच्या स्पर्धेत सर्वप्रथम बाद फेरी गाठण्याचा मान

वृत्तसंस्था, ग्वादालाहारा

दक्षिण कोरियाच्या बचावातील चुकीचा फायदा घेत मेक्सिकोने यंदाच्या विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत बाद फेरी (राउंड ऑफ ३२) गाठणारा पहिला संघ ठरण्याचा मान मिळवला. अत्यंत संघर्षपूर्ण ठरलेल्या सामन्यात मेक्सिकोने कोरियाचा १-० असा पराभव केला. गेल्या (२०२२) विश्वचषकात साखळी फेरीतच गारद होण्याची नामुष्की ओढवलेल्या मेक्सिकोने या वेळी मात्र मायदेशात खेळताना दबदबा राखला आहे. सह-यजमान असलेल्या मेक्सिकोचा हा सलग दुसरा विजय ठरला.

ग्वादालाहारा येथील एस्टाडिओ एक्रॉन येथील खचाचक भरलेल्या स्टेडियममध्ये चाहत्यांनी जल्लोष केला, गाणी गायली, तर मेक्सिकोच्या खेळाडूंनीही मैदानाबाहेर येत चाहत्यांना अभिवादन केले. सामन्याच्या ५०व्या मिनिटाला कोरियाचा गोलरक्षक किम स्युंग-ग्यू आणि बचावपटू ली गी-ह्युक यांच्यात टक्कर झाली. त्यामुळे गोलरक्षक किम याच्या हातून फुटबॉल सुटला आणि गोलक्षेत्राच्या आत पडला. या झटापटीदरम्यान जवळच असलेल्या मेक्सिकोच्या लुईस रोमोने संधीचा फायदा घेत सहज गोल केला.

मी गोल वाचवला तो क्षण अतिशय वेगवान होता. माझ्याकडून झालेली ती केवळ एक तात्कालिक प्रतिक्रिया होती. मी नेमके काय पाहिले हे मी तुम्हाला सांगू शकत नाही, कारण मला फक्त माझ्या सहकाऱ्यांशी झालेली टक्कर आणि माझ्या हातात आलेला फुटबॉल एवढेच आठवते. जेव्हा संघाला माझी सर्वात जास्त गरज होती, तेव्हा मी मदतीला धावून आलो याचा मला मनापासून आनंद आहे. - राऊल रान्हेल, मेक्सिकोचा गोलरक्षक

संथ सुरुवात

मेक्सिको आणि दक्षिण कोरिया यांच्यातील सामन्याची सुरुवात संथ झाली. दोन्ही संघांना गोल करण्याच्या फारशा संधी मिळाल्या नाहीत. त्यामुळे पूर्वार्धानंतर प्रेक्षकांची दोन्ही संघांची हुर्यो उडविण्यास सुरुवात केली. मेक्सिको संघ चार वर्षांपूर्वी कतारमध्ये साखळी फेरीतच बाद झाला होता. त्यापूर्वी सलग सात वेळा ते 'राउंड ऑफ १६'मध्ये पराभूत झाले होते. कोरियाचा प्रमुख खेळाडू ३३ वर्षीय सॉन ह्युंग-मीनसाठी हा सामना पुन्हा एकदा निराशाजनक ठरला आणि ५७व्या मिनिटाला त्याला प्रशिक्षकांनी मैदानातून बाहेर बोलावले. संपूर्ण सामन्यात कोरियाने मेक्सिकोला आक्रमण करण्यासाठी आमंत्रित केले आणि स्वतः प्रतिआक्रमणावर अवलंबून राहिले. सामन्याच्या ७५व्या मिनिटाला राऊल हिमेनेझने मारलेला जोरदार फटका दक्षिण कोरियाचा गोलरक्षक किम याने अडवला आणि मेक्सिकोची आघाडी वाढू दिली नाही. कोरियाच्या संघाने शेवटपर्यंत प्रयत्न केले, पण त्यांना बरोबरी साधता आली नाही. मेक्सिकोने दोन सामन्यांत सहा गुणांसह 'अ' गटामध्ये अव्वल स्थान मिळवले आहे.

गोलपेक्षा 'सेव्ह'ची चर्चा

- कोरियाविरुद्ध लुईस रोमोने मेक्सिकोसाठी विजयी गोल केला. मात्र, त्याहीपेक्षा गोलरक्षक राऊल रान्हेल्याच्या 'सेव्ह'ची चर्चा अधिक झाली. पिछाडीनंतर कोरियन खेळाडू बरोबरीसाठी सर्वतोपरी प्रयत्न करत होते. सामन्याच्या ८७व्या मिनिटाला ली ग्युं सुंग याला मिळालेली थोर करण्याची सुवर्णसंधी मेक्सिकोचा गोलरक्षक रान्हेल्याच्या प्रयत्नांमुळे फोल ठरली.
- फुटबॉलविश्वात 'तालां' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या रान्हेलने या वेळी लाजीपाठ दोन वेळा गोल वाचवला. प्रथम एका क्रॉसपासवर तो ली सुंगने नोलपोस्टच्या अगदी जवळून वेगावान आणि अचूक हेडर मारला. चेंडू गोलजाळीत जात असतानाच रान्हेलने खाली झेप घेत उजव्या पायाने तो अडवला.
- या क्षणाला रान्हेल आपल्याच एका सहकाऱ्यावर आदळून खाली पडला. चेंडू हवेत उडाला. या संधीवर कोरियाच्या यांग ह्युन जूनला गोल करण्याची संधी मिळाली. मात्र, खाली पडलेल्या रोटेलरीत रान्हेलने आपला हात उंचावला आणि चेंडू गोलरेषा ओलांडण्यापूर्वीच हवेत अडवला. या बचावाचे वर्णन नंतर 'चमत्कार' म्हणूनच केले गेले.

विश्वचषकातील आजचे सामने

- नेदरलँड्स वि. स्वीडन वेळ : रात्री ९०.३० वा.
- जर्मनी वि. आयव्हरी कोस्ट वेळ : मध्यरात्री १.३० वा (रविवार)
- इक्वेडोर वि. कुरासाओ वेळ : सकाळी ५.३० वा. (रविवार)
- ट्युनिशिया वि. जपान वेळ : सकाळी ९.३० वा. (रविवार)
- थेट प्रक्षेपण : 'युनाइटट स्पोर्ट्स', 'झी ५'

स्वित्झर्लंडपुढे बोस्नियाची शरणागती

मान्झाम्बीचे निर्णायक योगदान; गटात दुसऱ्या स्थानावर

वृत्तसंस्था, इंगलवूड

बदली खेळाडू म्हणून मैदानात आलेल्या योहान मान्झाम्बीने नोंदवलेल्या दोन गोलच्या जोरावर स्वित्झर्लंडने यंदाच्या विस्तारित विश्वचषक फुटबॉल स्पर्धेतील आपले आव्हान कायम राखले. स्वित्झर्लंडने दुसऱ्या साखळी सामन्यात बोस्निया-हर्जेगोविनावर ४-१ असा मोठा विजय मिळवला आणि 'बी' गटात कॅनडापाठोपाठ दुसरे स्थान पटकावले.

बोस्नियाचा ही केवळ दुसरीच विश्वचषक स्पर्धा असून, स्वित्झर्लंडविरुद्धच्या पराभवानंतरही त्यांचा बाद फेरीत पोहोचण्याचा मार्ग अजून खुला आहे. स्वित्झर्लंडला गेल्या आठवड्यात कतारविरुद्ध १-१ अशा निराशाजनक बरोबरीवर समाधान मानावे लागले होते. मात्र, दुसऱ्या सामन्यात त्यांनी गेल्या नऊ

स्पर्धांत्मक सामन्यांमध्ये अपराजित राहिलेल्या बोस्नियाच्या संघावर पूर्ण वर्चस्व गाजवले.

स्वित्झर्लंडने पूर्वार्धात चेंडूवर ताबा राखला, पण त्यांना गोलच्या संधी निर्माण करता आल्या नाहीत. तुलनेत उत्तरार्धात त्यांनी आक्रमणाची धार वाढवली. एन्डोयेने एक उत्कृष्ट बायसिकल किक मारली होती, परंतु बोस्नियाचा गोलरक्षक निकोला वासिली याने तितक्याच सतर्कतेने तो चेंडू अडवला. सामन्यात गोलशून्य बरोबरी असताना मान्झाम्बी मैदानात आला. त्याने (७४व्या आणि ९०व्या मिनिटाला) दोन गोल करत स्वित्झर्लंडच्या विजयात निर्णायक भूमिका बजावली.

त्याच्या दोन गोलदरम्यान रुबेन व्हर्गासने (८४व्या मि.) गोल करून संघाची आघाडी भक्कम केली. बोस्नियाच्या तारिक मुहरेमोविचला प्रतिस्पर्धी खेळाडू धोकादायक पद्धतीने अडवल्यामुळे रेड कार्ड दाखवून मैदानाबाहेर काढण्यात आले होते, ज्यामुळे बोस्नियाचा संघ १० खेळाडूंसह खेळत होता. सामन्याच्या ९० व्या मिनिटाला व्हर्गासच्या पासवर मान्झाम्बीने वैयक्तिक दुसरा गोल केला, तर सामन्याच्या अगदी शेवटच्या क्षणी भरपाई वेळेत मिळालेल्या पेनल्टीवर कर्णधार ग्रॅनिट झाकाने गोल करत स्वित्झर्लंडच्या ४-१ अशा विजयावर शिक्कामोर्तब केले. बोस्नियाकडून एर्मिन माहमिचने अगदी शेवटी बचावपटूंनी वेढल्यानंतरही वेगवान किक मारत संघाचा एकमात्र गोल केला.

डेव्हिडमुळे कॅनडाचा ऐतिहासिक विजय

व्हँकुव्हर : आघाडीपटू जोनाथन डेव्हिडच्या शानदार हॅट्ट्रिकच्या जोरावर कॅनडाने विश्वचषक फुटबॉल स्पर्धेच्या इतिहासातील आपल्या पहिल्या विजयाची नोंद करताना कतारच्या ६-० असा धुव्वा उडवला. मात्र, यह-यजमान कॅनडाच्या या ऐतिहासिक यशाला मध्यरक्षक इस्माईल कोने याच्या गंभीर दुखापतीने गालबोट लागले.



सामन्यात सुरुवातीपासून वर्चस्व गाजवणारा कॅनडा संघ ३-० असा आघाडीवर असताना कतारचा असिम ओमर मादीवो आणि कोने चेंडूसाठी झुंज देताना जोरदार धडकले. या घटनेनंतर बराच वेळ खेळ थांबवावा लागला आणि कोनेला स्ट्रेचरवरून मैदानाबाहेर नेण्यात आले. सुरुवातीला मादीवोला पिवळे कार्ड दाखवण्यात आले होते, पण व्हिडिओ असिस्टंट रेफ्रीच्या हस्तक्षेपानंतर ते लाल कार्डमध्ये बदलण्यात आले. कॅनडाच्या चाहत्यांनी कोनेच्या नावाचा जयघोष केला. कोनेने स्ट्रेचरवरून चाहत्यांना हात उंचावून प्रतिसाद दिला. या विजयामुळे कॅनडाचा बाद फेरीत प्रवेश जवळपास निश्चित झाला असला, तरी कोनेची दुखापत संघाच्या पुढील वाटचालीसाठी मोठा धक्का मानली जात आहे.

अंबानींच्या नव्या पिढीकडे 'महा-आयपीओ'ची धुरा

'जिओ'च्या २७ कोटी समभागांच्या विक्रीचा प्रस्ताव दाखल

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

मुंबई : देशातील सर्वाधिक बाजार मूल्य असलेली कंपनी रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडने तिचा डिजिटल आणि दूरसंचार विभाग असलेल्या 'जिओ प्लॅटफॉर्म्स'ने प्रारंभिक समभाग विक्रीसाठी (आयपीओ) मसुदा प्रस्ताव नियामकांकडे शुक्रवारी दाखल केला. यातून अनेक महिन्यांपासून सुरू असलेल्या अटकळींना पूर्णविराम मिळाला असून, भारतातील आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या सार्वजनिक समभाग विक्रीच्या प्रक्रियेला झालेली ही औपचारिक सुरुवात मानली जात आहे.

शुक्रवारी मुकेश अंबानी यांनी रिलायन्सच्या ४९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ही घोषणा केली. संचालक मंडळाने २७ कोटी समभागांच्या प्रारंभिक विक्रीस मान्यता दिली असल्याचे त्यांनी आपापसांत. तथापि या सभेला त्यांनी राज्याभिषेक सोहळ्याचेही रूप दिले. त्यांनी कंपनीची सूत्रे पुढच्या पिढीच्या हाती सोपवत असल्याची आणि आकाश, ईशा व अनंत अंबानी ही त्यांची मुलेच या महा-आयपीओची प्रक्रिया चालवणार असल्याचे आवर्जून नमूद केले.

प्रस्तावित आयपीओत रिलायन्स सुटसुटीत आहे. १० रुपये दर्शनी मूल्याच्या२७ कोटी समभागांची ही पूर्णपणे नव्याने विक्री (फ्रेश इश्यू) असेल. महणजेच विद्यमान भागधारकांपैकी कोणीही हिस्सा विकणार नाही.

बाजारातील अंदाजानुसार, याद्वारे साधारण ३५ ते ४० हजार कोटी रुपये उभारले जातील. यामुळे कंपनीचे मूल्यांकन हे १२ ते १५ लाख कोटी रुपये पातळीवर जाईल. जे 'जिओ'ला जगातील सर्वाधिक मूल्य असलेल्या सूचीबद्ध कंपन्यांच्या पंक्तीत स्थान मिळवून देणारे ठरेल.

आयपीओच्या घोषणेसह, 'जिओ'च्या विस्ताराच्या पुढील टप्प्यासाठी पाच धोरणात्मक प्राधान्यक्रमही मांडण्यात आले. कंपनी 'जिओ टू५जी' नेटवर्कचा स्वीकार वाढवण्याची योजना आखत आहे.

२०३० पर्यंत सर्व ग्राहकांना ५जी सेवेवर आणण्याचे उद्दिष्ट कंपनीने ठेवले आहे, तसेच ६जी मानकांच्या विकासामध्ये भारताची भूमिका अधिक बळकट करण्यावरही कंपनी भर देत आहे. शिवाय 'जिओ एअर फायबर'द्वारे हाय-स्पीड ब्रॉडबँड सेवांचा विस्तार करण्यावेही उद्दिष्ट आहे. सुमारे ९० टक्क्यांहून अधिक

'रिलायन्स'च्या विद्यमान भागधारकांना लाभ शक्य

अंबानी यांनी 'जिओ'च्या आयपीओला कंपनीसाठी या वर्षातील मूल्य निर्मितीची सर्वात महत्त्वपूर्ण घटना म्हटले आहे. ते म्हणाले, 'जिओ'ची प्रस्तावित सूचिबद्धता जगाला हे दाखवून देईल की, भारत जागतिक स्तरावरील, जागतिक क्षमता असलेल्या आणि जागतिक मूल्य निर्माण करणाऱ्या तंत्रज्ञान कंपन्या उभारू शकतो. मसुदा प्रस्तावाच्या मंजुरीनंतर, अंतिमतः 'बुक-बिल्डिंग' प्रक्रिया निर्धारीत केली जाईल तेव्हा रिलायन्स विद्यमान भागधारकांना प्रस्तावित आयपीओत वाटा दिला जाईल, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

जोडण्या २४ तासांच्या आत पूर्ण केल्या जातात आणि दरोज ६०,००० पर्यंत नवीन घरांना ब्रॉडबँड जाळ्याशी जोडले जात आहात.

नव्या डिजिटल युगाचे नेतृत्व

रिलायन्स इंडस्ट्रीज आणि जिओ प्लॅटफॉर्म्स २०२६ पासून सुरू होणाऱ्या पुढील सात वर्षांत एआय-संबंधित उपक्रमांमध्ये १० लाख कोटी रुपयांची गुंतवणूक करतील, असे अंबानी यांनी जाहीर केले होते. कंपनीने 'जिओ इंटेलिजन्स' नावाची पूर्ण मालकीची उपकंपनीही स्थापन केली आहे. ही कंपनी मोठ्या प्रमाणावरील डेटा सेंटर पायाभूत सुविधा आणि 'एज कम्प्युटिंग' क्षमतांद्वारे एआय सेवांचा विस्तार करण्यावर लक्ष केंद्रित करत आहे.

बड्या तंत्र कंपन्यांची पहिली पसंती

जिओ प्लॅटफॉर्म्सने यापूर्वी जगातील काही सर्वात मोठ्या गुंतवणूकदारांना आकर्षित केले आहे. २०२० मध्ये, कंपनीने मेटा, गूगल, केकेआर, सिल्व्हर लेक आणि जनरल अटलांटिक यांसारख्या गुंतवणूकदारांकडून २,०००० कोटी डॉलरहून अधिक निधी उभारला.

या व्यवहारामुळे कंपनीचे मूल्य ५,७०० अब्ज ते ६५०० कोटी डॉलरच्या दरम्यान निश्चित गेले आहे. सध्या रिलायन्स इंडस्ट्रीजकडे जिओ प्लॅटफॉर्म्सचा ६६.४३ टक्के हिस्सा आहे, तर मेटाकडे ९.९९ टक्के हिस्सा आहे. मेटाने हा हिस्सा २०२० मध्ये ५७० कोटी डॉलरच्या गुंतवणुकीद्वारे मिळविला आहे.

टाटा कॅपिटल लिमिटेड

नोंदणीकृत पत्ता: टॉवर ए, अक्सायचा मजला, पेनिन्सुला बिजनेस पार्क, गणपतराव कदम मार्ग, लोअर परेल, मुंबई - 400013,
शाखेचा पत्ता:सातावा मजला, रिझाव हाऊस, एमपीएल घर क्र. 247/0-3, वॉर्ड क्र. 65, मौजा सीताबर्डी, मोहन नगर, किंग्सवे, नागपूर, महाराष्ट्र - 440001.

अचल मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट रूल्स, 2002 च्या नियम 9(1) सह वाचण्याचा नियम 8(6) मधील तरतुदीसह वाचण्याचा येणाऱ्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल अॅसेट्स अँण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, 2002 अंतर्गत अचल मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलावाची सूचना.

कर्ज खाते क्र.:TCFLA027500001169635. श्री. कपिल किशोर विठ्ठलकर

वाढते सूचित करण्यात येते की टाटा कॅपिटल लि. (टीसीएल) हे नॉन-बँकिंग वित्तपुरवठा कंपनी असून कंपनी अधिनियम, 1956 च्या तरतुदींनुसे स्थापित आहे आणि त्यांचे नोंदणीकृत कार्यालय पेनिन्सुला बिजनेस पार्क, टॉवर ए, अक्सायचा मजला, गणपतराव कदम मार्ग, लोअर परेल, मुंबई -400013 येथे आणि शाखा कार्यालय इतर ठिकाणांसह नागपूर, महाराष्ट्र येथे आहे ("शाखा"). सी.टि. 24.11.2023 रोजीच्या अंदेशाच्या सहीने कंपनी विषी न्यायाधिकरण (एसीएटी), मुंबई यांचे कंपनी अधिनियम, 2013 च्या अनुच्छेद 66 व इतर लागू तरतुदींच्या वाचण्याच येणाऱ्या अनुच्छेद 230 ते 232 च्या तरतुदीतील स्पष्टतेकरीता बापर 22 कॅपिटल फायनॅन्शियल सर्व्हिसेस लिमिटेड ("टीसीएलएसएल") व टाटा कॅपिटल कॅपिटल लिमिटेड ("टीसीसीएल") आणि हस्तांतरिती बापर 22 कॅपिटल लिमिटेड ("टीसीएल") यांचेदरम्यान एकत्रीकरणाची योजना मंजूर केलेले आहे ("सदर योजना"). त्या अनुषंगे, टीसीएलएसएल आणि टीसीसीएल (हस्तांतरकर्ते कंपन्या) यांचे सर्व मालमत्ता, मत्ता, हक्क, लाभ, हितसंबंध, दर, वाभणत्र, दायित्वे, कंत्राटे, करार, अनमनते इ. सह दि. 01.01.2024 पासून नवीन स्थापन अंतभूत कंपनीमध्ये, चालू असायाना नमूद, टीसीसीएल योजना एकत्रीकरणास झाले आहे. सदर आदेशाच्या योजनेच्या बोर्ड टीसीएलएसएल यांनी निष्पादित केलेल्या सर्व सुविधा आणि त्या सोपविताना सर्व बक्कलची अनंदेश कंपनीच्या नावे हस्तांतरित झालेली आहे आणि त्यामुळे टीसीएल यांना [कर्जदार/सह-कर्जदारकेडून] त्यांचे मागणी करण्याचा अधिकार आहे.

वाढते कर्जदार/सह-कर्जदार व सर्व लोकांना सूचित करण्यात येते की टाटा कॅपिटल लिमिटेड (सुरक्षित धनको/टीसीएल) कडे तारण असलेल्या खालील वर्णनाच्या मालमत्तेवर टाटा कॅपिटल लिमिटेड (सुरक्षित धनको) च्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी यांनी ताबा घेतलेला असून तिची दि. 14 जुलै, 2026 रोजी "जशी आहे जेथे आहे" आणि "जशी आहे ते काही आहे आणि तेथे जे काही आहे ते इतर कोणताही उपाय नाही" तत्वावर विक्री करण्यात येईल.

त्यांअर्थी, सुरक्षित कर्जाच्या वसुलीसाठी अनमत नोंदवी विक्री करावयाची असल्याने आणि कर्जदार/सह-कर्जदार/ जामीनदार मंडळ (1) श्री. कपिल किशोर विठ्ठलकर, 2) प्रणती कपिल विठ्ठलकर, 3) कोचन किशोर विठ्ठलकर, 4) श्री. किशोर श्री विठ्ठलकर 1 ते 4 यांचा पत्ता: फ्लॉट क्र. 4 आणि 8, मौजा सावरेगर, वॉर्ड क्र. 8, ब.न.क्र. 216, सर्व्ह क्र. 220, काकडे लेआऊट, सेंगांसी मंगळवारी मार्ग, हिंदी चौक, हलगुळा-नावरेग, जिल्हा नागपूर - 441107; 5) मे. पगमाया एक कम्प्युटर्स अँड इलेक्ट्रॉनिक्स, यांचा वर्तमान व्यवसाय प्रोप्राइटर कपिल विठ्ठलकर, पत्ता: सेंगांसी सभागृह, काकडे लेआऊट, हिंदी चौक, वॉर्ड क्र. 8, सावरेगर, नागपूर-441107 यांचेकडूनदि. 18-जून-2026 रोजी कर्ज खाते क्र. **TCFLA027500001169635** अन्वये ₹.51,58,803/- (रुपये एक्कावन लक्ष अठ्ठावन हजार आठशे तीन फक्त) एवढी बकबाकी घेणे आहे.

वाढते सूचित करण्यात येते की किंवा पूर्वे ढकलण्यात/खंडित करण्यात न आल्यास सदर मालमत्तेची लिलाव द्वारे दि. 14 जुलै 2026 रोजी दु. 2.00 वाजता त्यांचे शाखा कार्यालय सातावा मजला, रिझाव हाऊस, एमपीएल घर क्र. 247/0-3, वॉर्ड क्र. 65, मौजा सीताबर्डी, मोहन नगर, किंग्सवे, नागपूर, महाराष्ट्र -440001 येथे ई-लिलावाद्वारे विकी करण्यात येईल.

सदर मालमत्तेच्या खरेदीसाठी ज्यांना स्वरूपाच किमांद द्वारमत्र लिलाव विक्री करावयाचा येथील अधिकृत अधिकाऱ्यांकडे दि. 13 जुलै,2026 रोजी सायं. 5.00 वाजेपर्यंत सर्वकागपत्रे येतील.

अनामत भरणेचे वर्णन	ताब्याचा प्रकार / रचनात्मक/प्रत्यक्ष	आरक्षित किंमत (रु.)	बयाणा रक्कम (रु.)
फ्लॉट क्र. 4, क्षेत्रफळ सुमारे 37.10 चौ.मी. (म्हणजे 400 चौ.फू.), जमीन सर्व्हे क्र. 220, मौजा सावरेगर, बेदोबल क्र. 216, प.ह.क्र. 34, नगर पंचित सावरेगर यांच्या हद्दीत, वॉर्ड क्र. 2, तहसील सावरेगर, जिल्हा नागपूर, सदर फ्लॉटच्या चतुःसीमा: पूर्वेस- श्री. रेतारकर यांचे घर, पश्चिमेस- 10 फू. रुंद रस्ता, उत्तरेस- श्री. नांजेवार यांचे घर, दक्षिणेस- फ्लॉट क्र. 4 चा उर्वरित भाग यातह तेथे असलेले बांधकाम. आणि फ्लॉट क्र. 8 चे क्षेत्रफळ सुमारे 92.90 चौ.मी. (म्हणजे 1000 चौ.फू.), जमीन सर्व्हे क्र. 220, मौजा सावरेगर, बेदोबल क्र. 216, प.ह.क्र. 34, नगर पंचित सावरेगर यांच्या हद्दीत, वॉर्ड क्र. 2, तहसील सावरेगर आणि जिल्हा नागपूर, सदर फ्लॉटच्या चतुःसीमा: पूर्वेस- लेआऊट रस्ता, पश्चिमेस- अहिल्या कन्हर्ट यांचे घर, उत्तरेस- श्री. काकडे यांचे घर, दक्षिणेस- फ्लॉट क्र. 8 चा उर्वरित भाग त्यावर उभ्या असलेल्या बांधकामासह.	प्रत्यक्ष	रु. 35,05,000/- (रुपये पंचविस लक्ष पाच हजार फक्त)	रु. 3,50,500/- (रुपये तीस लक्ष पन्नास हजार पाचशे फक्त)

विक्रीचे कडाक्याने आलेल्या मालमत्तेचा तपशील अनुसूचीमध्ये देण्यात आलेला आहे. वर नमूद अनामत भरणेच्या आत आलेल्या संगम बनून / घसुनी वसू लिलाव विक्री सूचनेत तसे विहितपणे नमूद न केल्यास अनमत भरणेत विक्रीसाठी उत्तरच मानतील. प्राधिकृत अधिकाऱ्यांकडे वर नमूद खान, व्यापार व शुल्काचा (विक्रीच्या दर्पाचार) चषक केल्याचा किंवा सुरक्षित कर्ज, व्याज व शुल्काचा पगा करण्याचा अन्यायी सामाधानकारक पुरावा त्यांना देण्याचा आल्याचा किंवी बंधनिण्याचा रोहित. विक्रीचा येथे साधारणपणे लोकांना त्यांच्या निविदा स्वतः सादर करण्यास सांगितले जाते. सदर विक्रीच्या संदर्भात इतरांच्या किंवा अज्ञानतुमचे कोणतेही भूमिका वजानयाला कोणत्याही अधिकाराचा किंवा इतर जबाबदेही किंवा कर्तव्याचे किंवा अधिकाराचे मालमत्तेवरी बोली देता येणार नाही. कोणत्याही हितसंबंधाचे अधिप्राय किंवा तसे करण्याचा इतर कारण येथून घेतला जाता येणार नाही. सदर विक्री ही सर्वसंबंधित अधिनियम, 2002 मधे विहित करण्यात अलेल्या अटी/नियमांच्या अधीन सदर करण्यात येईल. सदर ई-लिलाव हा दि. 14 जुलै, 2026 रोजी दु. 2.00 ते 3.00 वाजेपर्यंत https://BidDealLin या पोर्टलवरील येणारा हेतेन आणि यात प्रत्येकी 10 मिनिटांचे अमर्याद कालविस्तार आणतील. मालमत्तेच्या खरेदीसाठी सदर करण्यात येणारे सर्व बोलीसंबंधा "टाटा कॅपिटल लिमिटेड" यांचे नावे काढण्यात आलेल्या आणि नागपूर येथे देय असलेल्या डिमांड ड्राफ्टच्या स्वरूपातील बयाणा रक्कम अगावी. मालमत्तेची पहाणी दि. 06 जुलै, 2026 रोजी स. 11 ते सायं. 5.00 वाजेपर्यंत करता येईल.

टीप: इच्छुक बोलीदार टाटा कॅपिटल लिमिटेड यांचेशी संपर्क साधावे. श्री. +91-8691005238 (प्राधिकृत अधिकारी श्री मनिष शेठ) ईमेल आयडी manish.shendre@tatacapital.com आणि संपर्क क्र. 9820257322 यांचेशी संपर्क साधू शकतात.

विक्रीच्या अटी व शर्तीच्या तपशीलासाठी कृपया सुरक्षित धनकोच्या वेबसाईटवर दिलेल्या लिंकला भेट द्या http://www.tatacapital.com/content/dam/tcl/03rd-E-Auction-Newspaper-Publication-Mr-Kapil-Vinchurkar-TCFLA027500001169635.pdf येथे भेट द्यावी.

स्थान: नागपूर (महाराष्ट्र)
दिनांक: 20-06-2026

स्वा/- प्राधिकृत अधिकारी
टाटा कॅपिटल लिमिटेड

पंजाब नॅशनल बँक punjab national bank

एसएमडी, मंडल कार्यालय,किंग्सवे,नागपूर-440010
फोन: 0712-2534323
ई-मेल :conagpursamd@pnb.bank.in

अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट रुल्स, 2002 च्या नियम 8 (6) मधील तरतुदीसह वाचण्याच येणा-या सिक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनांशियल अॅसेटस अँण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, 2002 अंतर्गत अचल मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलावाची सूचना. याद्वारे कर्जदार व जमानतदार तसेच सर्वसामान्य जनतेस सूचित करण्यात येते की सुरक्षित धनकोकडे तारण /भारग्रस्त असलेल्या खाली नमूद अचल मालमत्तेचा बँक/सुरक्षित धनकोस घेणे असलेल्या थकबाकी रक्कमेच्या वसुलीसाठी खाली नमूद केलेल्या दिनांकास त्याची "जशी आहे जेथे आहे", "जशी आहे जे काही आहे", आणि "जे काही आहे तेथेच आहे" तत्वावर विक्री करण्यात येईल. आरक्षित किंमत आणि बयाणा रक्कम खाली त्या त्या मालमत्तांच्या समोर नमूद करण्यात आलेली आहे.

सुरक्षित मालमत्तेचे वेळापत्रक
ई-लिलावची तारीख : 28/07/2026 (ईएमडी जमा करण्याची शेवटची तारीख : 27/07/2026)

अनु. क्र.	शाखेचे नांव / खाताचे नांव / कर्जदार (वैयक्तिक/संयुक्त/फर्म/कं.) चे नाव प्रोपायटर/भागीदार/संचालक/जमानतदार	अचल संपत्तीचा तपशील तारण/मालकाचे नांव (मालमत्ता तारण)	अ) सेक्यूरल 2002 अन्वये मागणी सूचना तारीख ब) 13(2) सूचनेच्या तारखेनुसार थकीत क) सेक्यूरल 13(4) सरफेसी अॅक्ट 2002 अन्वये ताबा तारीख ड) ताबाचे स्वरुप प्रतिकात्मक/भौतिक/ रचनात्मक	अ) राखीव किंमत (रुपये लाखात) ब) ईएमडी क) बोली वाढ करण्याची रक्कम	ई-लिलाव तारीख /वेळ
1)	शाखा : यवतमाळ श्री नितीन नामदेवराव नागविये (कर्जदार/गहाणदार) श्री महादेव रघुनाथ ढोणे (जमानतदार)	जागेचा सर्व भाग व तुकडा शॉप नं.1 बांधकाम तळ माळ्या प्लॉट नं.13 आणि 14, जागा सर्व्हे नं.19/1 बिल्डींग चे नाव "राधाकिष्णा अपार्टमेंट" एरिया 145 स्के.फीट, बिल्ट अप एरिया 13.37 स्के.मि. संभाजी नगर, डॉ. गिरी हॉस्पिटल जवळ, मौजा वाघपुर, तह. आणि जि. यवतमाळ येथील श्री नितीन नामदेवराव नागविये यांच्या नावाने. चतुःसिमा : पुर्वेस-अपार्टमेंट चा उर्वरित भाग, पश्चिमेस -लेआऊट रोड, उत्तरेस-शॉप नं.2, दक्षिणेस-अपार्टमेंट ची खुली जागा	अ) रु.11,07,000/- ब) रु.9,19,657.00 30/09/2018 रोजी + 01/10/2018 पासुन व्याज आणि शुल्क क) 31/05/2023 ड) भौतिक ताबा	क) रु.10,000/-	दि. 28/07/2026 सकाळी 11.00 ते दुपारी 04.00
		जागेचा सर्व भाग व तुकडा शॉप नं.2 बांधकाम तळ माळ्या प्लॉट नं.13 आणि 14, जागा सर्व्हे नं.19/1 बिल्डींग चे नाव "राधाकिष्णा अपार्टमेंट" एरिया 145 स्के.फीट, बिल्ट अप एरिया 13.37 स्के.मि. संभाजी नगर, डॉ. गिरी हॉस्पिटल जवळ, मौजा वाघपुर, तह. आणि जि. यवतमाळ येथील श्री नितीन नामदेवराव नागविये यांच्या नावाने. चतुःसिमा : पुर्वेस-उर्वरित भाग आणि खुली जागा स्कीम, पश्चिमेस-लेआऊट रोड, उत्तरेस-शॉप नं.3, दक्षिणेस-शॉप नं.3	अ) रु.11,07,000/- ब) रु.9,19,657.00 30/09/2018 रोजी + 01/10/2018 पासुन व्याज आणि शुल्क क) 31/05/2023 ड) भौतिक ताबा	क) रु.10,000/-	
2)	शाखा : धरमपेठ, नागपूर श्रीमती शाहीना अंजुम अहमद (कर्जदार/गहाणदार) श्री अहमद अशफाक अब्दुल खालीक असारी उर्फ श्री अहमद अशफाक अब्दुल खालीक सिमनानी (सह-कर्जदार /गहाणदार)	जागेचा सर्व भाग आणि तुकडा मध्ये 11.91 प्रतिशत हिस्सा आणि व्याज महानगपालिका वार्ड नं. 09, अंदाजे आराजी 2045 स्के.फीट (190.00 स्के.मि.) मौजा नागपूर एकत्रित आरसीसी स्ट्रक्चर निवासीय फ्लॅट नं.101, बिल्ट अप एरिया 61.74 स्के.मि. पहीला माळा "श्री क्षपीलौटी अपार्टमेंट" सिटी सर्वे नं.288, शिट नं.162, वार्ड नं.35, मौजा नागपूर, गांजाखेत, जुना मंडारा रोड, नागपूर, महानगरपालिका नागपूर आणि नागपूर सुधार प्रन्यास नागपूर च्या क्षेत्रामध्ये श्रीमती शाहीना अंजुम अहमद श्री अहमद अशफाक अब्दुल खालीक सिमनानी यांच्या नावाने. चतुःसिमा:पुर्वेस-लेन श्री अब्दुल जब्बार यांचे घर, पश्चिमेस-श्रीमती साइदा अब्दुल जब्बार यांचे घर, उत्तरेस-जुना मंडारा रोड, दक्षिणेस-लेन आणि त्यानंतर श्री अब्दुल खिमनानी यांचे घर	अ) 30/01/2026 ब) रु.29,69,632.78 29/01/2026 रोजी + 01/01/2026 पासुन व्याज आणि शुल्क क) 06/05/2025 ड) सांकेतिक ताबा	अ) रु.47,84,000/- ब) रु.4,78,400/- क) रु.10,000/-	दि. 28/07/2026 सकाळी 11.00 ते दुपारी 04.00

सुरक्षित धनोस ज्ञात बोजे-ज्ञात नाहीत

ई-लिलाव विक्रीच्या अटी व शर्ती :

ही विक्री सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मध्ये विहित करण्याच आलेल्या अटी व शर्ती आणि पुढील अटींच्या अधीन असेल.

1) ही लिलाव विक्री https://baanknet.com/पोर्टलवर "ई-लिलाव माध्यमाद्वान" ऑनलाईन करण्यात येईल.
2) इच्छुक बोलीदार/खरेदीदारांना विनंती आहे की त्यांनी त्यांचा ईमेल आयडी आणि मोबाईल नंबर वापरून (https://baanknet.com) पोर्टलवर नोंदणी कर